**स्पर्धेचे नियम :**

१) तालुकास्तरीय इयत्ता ५ वी ते ७ वी गट कथाकथन स्पर्धा सोमवार दिनांक १०.९.२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता सुरू होतील.

२) जिल्हास्तरीय इयत्ता ८ वी ते १० वी गट व ११ वी ते १२ वी गट वक्तृत्व स्पर्धा मंगळवार दिनांक ११.९.१८ रोजी सकाळी ११ वा. सुरू होतील.

३) स्पर्धकास वर नमूद केलेल्या कोणत्याही एका विषयावर ठरवून दिलेल्या वेळेत बोलता येईल.

४) जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेसाठी प्रत्येक शाळेतून / ज्युनि. कॉलेजमधून प्रत्येक गटासाठी दोन स्पर्धकास भाग घेता येईल.

५) तालुकास्तरीय कथाकथन स्पर्धेसाठी प्रत्येक शाळेतून दोन स्पर्धकास भाग घेता येईल.

६) वक्तृत्व व कथाकथन स्पर्धेतील परगावच्या स्पर्धकांना स्पर्धेच्या दिवशीचा एकेरी प्रवास खर्च दिला जाईल.

७) स्पर्धकांची नावे सोबतच्या प्रवेश अर्जात भरून शनिवार दिनांक ८.९.२०१८ पर्यंत सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनि. कॉलेज, सांगोला येथे दिलेल्या मुदतीत पोहोचतील याची दक्षता घ्यावी. संपर्क – प्रा. श्री. धनाजी चव्हाण – ८२७५०२५१५१ व श्री. उन्मेश आटपाडीकर – ८२७५४४८७०९.

८) स्पर्धेचे कामकाज पारदर्शक व बाह्य परीक्षकांमार्फत पार पाडले जाईल.

९) स्पर्धा समितीकडे स्पर्धा नियोजनाचे सर्व अधिकार राखून ठेवण्यात आलेले आहेत.

१०) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

११) वरील सर्व स्पर्धा सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनि. कॉलेज सांगोला येथे होतील.

१२) जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या सर्व स्पर्धकास सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.

१३) प्रवेशिका फोनवरून व वॉटस् ॲप द्वारे स्विकारल्या जातील. मात्र स्पर्धेच्या दिवशी मूळ प्रवेशिका सोबत असणे आवश्यक आहे.

१४) प्रवेश अर्ज व स्पर्धेसंबंधीची माहिती पुस्तिका संस्थेच्या www.stspm.org या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

१५) सदर स्पर्धांचा पारितोषिक वितरण सोहळा रविवार दिनांक १६/०९/२०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृह येथे होईल.

**टीप :** जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी येणाऱ्या स्पर्धक व शिक्षकांसाठी दुपारच्या भोजनाची व्यवस्था केलेली आहे.

तरी आपल्या प्रशालेतील, ज्युनि. कॉलेजमधील स्पर्धक सदर स्पर्धेसाठी पाठवून सहकार्य करावे ही सदिच्छा.

आपला विश्वासू,

**सोबत – १ प्रवेश अर्ज**

**(रा. मा. घोंगडे)**
प्राचार्य, सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनि. कॉलेज, सांगोला

# सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ

**आयोजित**

# कै. गुरुवर्य बापूसाहेब झपके स्मृती समारंभ

**गुणवंत शिक्षक पुरस्कार**
**कथाकथन, वक्तृत्व स्पर्धा २०१८**

**वर्ष ३७ वे**






प्रति,
मा. प्राचार्य / मुख्याध्यापक

______________________________

______________________________

______________________________

यांना स.न.वि.वि......

महोदय,

कै. परमपूज्य गुरुवर्य बापूसाहेब झपके म्हणजे सांगोल्यासारख्या उजाड माळरानावर विद्यार्थीरुपी चकोरांची ज्ञानतृष्णा भागविणारा एक सुधांशू अखंड परिश्रम, दुर्दम्य आशावाद, कमालीचा साधेपणा व मनाचा सच्चेपणा याचे मूर्तिमंत प्रतिक !

राष्ट्रपिता महात्मा गांधी व गांधीवाद यावर प्रचंड निष्ठा असणारे, देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून ब्रिटीशांचा कारावास भोगणारे, समाजऋणाची सर्वथैव जाणीव असणारे व विद्यार्थ्यांच्या मनावर आणि व्यक्तिमत्वावर रचनात्मक संस्कार करण्यातच आपल्या जीवनाची इतिकर्तव्यता मानणारे बापूसाहेब म्हणजे आमच्या मनाच्या गाभाऱ्यातील शिवमंगल मूर्ती ! आपल्या कर्तृत्वाने मातीलाही गंधित करणारी ही माणसंच समाजाला पुढं नेत असतात.

या ज्ञानियाच्या तेजाला, ज्ञान प्रकाशाच्या पूजकाला व सरस्वतीच्या पुत्राला त्रिवार अभिवादन !

कै. परमपूज्य बापूसाहेब झपके यांच्या ३७ व्या स्मृती समारोहानिमित्त आम्ही तालुकास्तरीय कथाकथन व जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करीत आहोत. या स्पर्धेसाठी आपल्या प्रशाला व ज्युनि. कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी सहभागी होण्यासाठी व त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आपल्या उदंड प्रतिसादाची अपेक्षा.

## स्पर्धेची माहिती

| | | | |
|---|---|---|---|
| गट १ ला<br>कथाकथन<br>(तालुकास्तरीय) | इ. ५ वी ते ७ वी<br>विषय – एक साहस कथा | दि. १०.९.२०१८<br>स. ११.०० वा. | कालावधी<br>५+१<br>मिनिटे |
| गट २ रा<br>वक्तृत्व<br>(जिल्हास्तरीय) | इ. ८ वी ते १० वी विषय –<br>१) आदर्शाचा महामेरू –<br>कै. गुरुवर्य बापूसाहेब झपके<br>२) स्वच्छ भारत – वास्तव की मृगजळ<br>३) आजची पिढी – मोबाईल वेडी<br>४) संस्कार–यशस्वी जीवनाचा पाया<br>५) माणसा, माणसा कधी होशील रे माणूस! | दि. ११.९.२०१८<br>स. ११.०० वा. | कालावधी<br>६+१<br>मिनिटे |
| गट ३ रा<br>वक्तृत्व<br>(जिल्हास्तरीय) | इ. ११ वी, १२ वी विषय –<br>१) निष्काम कर्मयोगी –<br>कै. गुरुवर्य बापूसाहेब झपके<br>२) सोशल मिडीयात गुरफटलेली तरुणाई<br>३) जल है तो कल है ।<br>४) कृषीप्रधान भारतातील<br>शेतकऱ्याची सद्यस्थिती<br>५) पर्यावरणाचे रक्षण – वसुंधरेचे संरक्षण | दि. ११.९.२०१८<br>स. ११.०० वा. | कालावधी<br>७+१<br>मिनिटे |

**प्रत्येक गटातील स्पर्धकासाठी पारितोषिके**

| नं. | पारितोषिके | जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा | | तालुकास्तरीय कथाकथन स्पर्धा |
|---|---|---|---|---|
| | | गट ११ वी, १२ वी | गट ८ वी ते १० वी | गट ५ वी ते ७ वी |
| १. | प्रथम | ३,०००/- | २,५००/- | २,०००/- |
| २. | द्वितीय | २,०००/- | २,०००/- | १,५००/- |
| ३. | तृतीय | १,५००/- | १,५००/- | १,०००/- |
| ४. | चौथे – फक्त मुलींसाठी | १,०००/- | १,०००/- | ७००/- |
| ५. | पाचवे –<br>* जिल्हास्तरीय स्पर्धा (सांगोला तालुक्यातील स्पर्धकासाठी)<br>* तालुकास्तरीय कथाकथन स्पर्धा (ग्रामीण स्पर्धकासाठी) | १,०००/- | १,०००/- | ७००/- |

**सर्व यशस्वी स्पर्धकास प्रशस्तीपत्रक व झपके कुटुंबियांकडून**
**कै. गुरुवर्य बापूसाहेब झपके स्मृतिचिन्ह**

# सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ

आयोजित

# कै. गुरुवर्य बापूसाहेब झपके स्मृती समारंभ

## गुणवंत शिक्षक पुरस्कार
## कथाकथन, वक्तृत्व स्पर्धा २०१८

---

१० व ११ सप्टेंबर २०१८

---

वर्ष ३७ वे

प्रति,

________________________________

________________________________

________________________________

✻ प्रेषक ✻

रा. मा. घोंगडे

प्राचार्य

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनि. कॉलेज, सांगोला